# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७

संदर्भ क्र. :शै.प्रवेश/४४९५

दिनांक :२१/१२/२०१७

**प्रकटन**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संत नामदेव अध्यासनाच्या वतीने **'परमहंस स्वामी स्वरूपानंद'** पुरस्कारासाठी ग्रंथ मागविण्यात येत आहेत.

- भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि संत वाङ्मय या विषयावरील मराठीतील उत्कृष्ट ठरणाऱ्या ग्रंथास पारितोषिक आणि ग्रंथ प्रकाशकास पारितोषिक दिले जाते.
- यासाठी दिनांक १ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या काळात प्रकाशित झालेले ग्रंथ विचारात घेतले जातील. लेखकाचा स्वतंत्र अर्ज असावा. त्यासोबत प्रकाशकाचे एक स्वतंत्र पत्र तसेच लेखकाचा अल्प परिचय व पुस्तकाच्या तीन प्रती पाठवाव्यात.
- विद्यापीठाने नेमलेल्या परीक्षक समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.
- या पुरस्कारासाठी पाठवावयाच्या प्रवेशिका गुरूवार, दि. ११ जानेवारी २०१८ पर्यंत मा. अध्यासन प्रमुख, संत नामदेव अध्यासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७ यांच्या नांवे पाठवाव्यात.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

**प्रत माहितीसाठी :—**

१. मा. अध्यासन प्रमुख, संत नामदेव अध्यासन : संत अध्ययन व संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे—७
२. मा. विभागप्रमुख, विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग
३. मा. कुलसचिव, महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठे
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
५. मा. संचालक, सर्व मान्यता प्राप्त संस्था
६. मा. जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय—आपणास विनंती की, सदरचे प्रकटन प्रसिध्द दैनिकांमधून बातमी म्हणून प्रसिध्द करण्यास संपादकांना कळवावे.